शोध... समर्थकृत दखनी-उर्दू रचनांचा!

समर्थ रामदासांनी १६३२ ते १६४४ या कालखंडात भारतभर भ्रमंती केली. यानिमित्ताने त्यांनी मराठीतर समाजांपर्यंत आपले विचार व तत्त्वज्ञान पोहोचवण्यासाठी दखनी-उर्दू, कन्नड, तेलुगू, अरबी, फारसी, पंजाबी, गुजराती, मारवाडी अशा अनेक भाषांमध्ये काव्यरचना केल्या. समर्थांना केवळ एका विशिष्ट समाजापुरतेच सीमित करण्याची संकुचित वृत्ती आज डोके वर काढत असताना त्यांच्या दखनी-उर्दूतील पदावल्या प्रसिद्ध होण्याला म्हणूनच महत्त्व आहे. 'समर्थ रामदासकृत दखनी-उर्दू पदावल्या' या संशोधनपर ग्रंथाच्या लेखिकेचा हा शोधप्रवास... त्यांच्याच शब्दांत!

■ मनीषा बाठे

'समर्थ रामदासकृत दखनी-उर्दू पदावल्या' या पुस्तकाचा प्रवास मांडताना दशकपूर्वीचा काळ डोळ्यांसमोर उभा राहिला. आयुष्याच्या त्या टप्प्यापर्यंत समर्थ रामदासांच्या वाङ्मयाचा अभ्यास हा माझ्या रामदासी रुटिनचा भाग झाला होता. २००१ मध्ये समर्थ ग्राफिक्स हा प्रकाशन-साहाय्य करणारा व्यवसाय सुरू केला. व्यवसायाच्या निमित्ताने हिंदी, मराठी, इंग्रजी, संस्कृतशिवाय गुजराती, कन्नड व तेलुगूचे औपचारिक शिक्षण घेतले. उर्दू कौन्सिल, पुणे येथून उर्दूचे शिक्षणही घेतले. कौमी कौन्सिल एच. आर. मिनिस्ट्रीचा कोर्स पूर्ण केला. याचदरम्यान समर्थांबद्दल काही विचित्र विधाने करणारी पुस्तके, लिखाण तसेच संस्था समाजात जोर धरू लागल्या होत्या. त्याचा एक समर्थप्रेमी म्हणून मला त्रास होत होताच. त्याचवेळी 'रामदास काय म्हणाले?' हे डॉ. गिरीश बापटलिखित पुस्तक अर्थात 'दासबोधार्क' रामदासी आचरणात आणत होते. अशा वादग्रस्त विधानांचे खंडन करायचे तर स्वतःची पातळी न सोडता त्यांना अभ्यासपूर्वक उत्तर देणे, हा एकच पर्याय होता.

त्यानुसार प्रथम समर्थांच्या 'मुसलमानी अष्टके' या हस्तलिखिताची नक्कल प्रत 'श्री समर्थ वाग्देवता, धुळे' येथून मागविली. तत्कालीन उर्दूचा सांगोपांग अभ्यास अन् त्यात माझ्यासारखी नवशिकी व्यक्ती! त्यामुळे प्रथम उर्दू भाषेच्या पुस्तकी अभ्यासापेक्षा मुद्रण-अनुवाद या माध्यमातून मुस्लीम समाजाचा पुरेसा अनुभव घ्यायचं ठरवलं. त्यानुसार समर्थांच्या संपूर्ण वाङ्मयाचा मागोवा घेण्यास सुरुवात केली.

अनेक रामदासी सांप्रदायिकांनादेखील हे माहीत नाही, की समर्थ रामदासांचे वाङ्मय मराठी, संस्कृतखेरीज दखनी उर्दू (हिंदुस्तानी), कन्नड, तेलुगू, मारवाडी, गुजराती, पंजाबी, अरबी, फारसी या भाषांमध्येही उपलब्ध आहे. त्यामुळे समर्थांसंबंधीच्या वादग्रस्त विधानांच्या खंडनार्थ दखनी उर्दू वाङ्मयाची निवड मला आवश्यक वाटली. माझ्या व्यावसायिक कामांमध्ये आधुनिक उर्दूचा वापर सुरूच होता. परंतु जुनी उर्दू वा दखनी उर्दूच्या अभ्यासाचा मार्ग सापडेना. आणि जोवर तत्कालीन उर्दूचा अभ्यास होत नाही तोवर समर्थकालीन भाषेवर लिहिणे म्हणजे 'अभ्यासोनी प्रकटावे...' हा समर्थ-उपदेश स्वतःच मोडण्यासारखे होते. त्यामुळे मग कासीम झुबेरी यांच्या साहाय्याने दिल्लीच्या कौमी कौन्सिलच्या सदस्यांशी संपर्क साधला. उर्दूचे विविध शब्दकोश, व्याकरणाची पुस्तके मिळवली; ज्यातून हे स्पष्ट झाले की, दखनी हीच आधुनिक उर्दू व हिंदीची जननी आहे. त्यासाठी जदीद हिंदी-उर्दू लुगत शब्दकोश- नासीर अहमद खान, (कौमी कौन्सिल फॉर उर्दू लँग्वेज, दिल्ली), उर्दू-हिंदी शब्दकोश- मुहम्मद मुस्तफा खाँ 'मद्दाह' (उत्तर प्रदेश हिंदी संस्थान, लखनौ), लुगाते सईदी- सं. मौलवी अब्दुल अजिज (मतबा मजिदी, कानपूर), फीरोजुल्लुगाते उर्दू (जदीद)- सं. फिरोजुल्ला खान (फिरोज सन्स, लाहौर) हे ग्रंथ खरेदी करून ते अभ्यासले.

या अभ्यासातून कळले की, १६ व्या शतकात दखनी उर्दू (पुरानी उर्दू) भाषेत १८ बोलीभाषांचा समावेश होता. समर्थांच्या पदावल्यांचे लिखाण यापैकी १३ बोलीभाषांमध्ये झालेले आहे. ज्यात अरबी, फारसी, तुर्की, संस्कृतसह खडीबोली, ब्रज, अवधी, भोजपुरी, हरियानवी, पहाडी, राजस्थानी, गौडी, हैदराबादी या बोलीतील शब्दांचा प्रभावी वापर हा या बोलींवरील समर्थांचे प्रभुत्व दाखवतो. मग प्रश्न आला- दखनीचा स्वतंत्र कोश मिळवता येईल का? कारण समर्थांच्या पदावल्यांतील जे शब्द उर्दू शब्दकोशांमध्ये अप्रकाशित वाटत होते ते सिद्ध करता यायला हवे. त्याचवेळी प्रा. फकरुद्दीन बेन्नूर यांचे पुस्तक वाचनात आले. त्यांना याबद्दलचे संदर्भ विचारले. त्यांनी पहिल्यांदा श्रीधर रघुनाथ कुलकर्णी यांच्या दखनी प्रबंधाची माहिती दिली. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्थेने प्रकाशित केलेल्या 'दखनी भाषा' (१८ बोलीभाषांच्या शब्दसूचीसह) या पुस्तकाच्या मदतीने दखनी शब्दार्थांचे काम पूर्ण झाले.

दरम्यान, भावार्थ लिहिण्यासाठी मला इस्लाम समजून घ्यावा लागेल हे कळून आले. समर्थकृत ३०० पदावल्यांपैकी ९५ पदावल्या 'खुदा, अल्ला' या विशेषणांना धरून केल्या होत्या. त्यातही 'मुसलमानी अष्टका'सारखा भागही होताच. त्यामुळे परिचित उर्दू व्यक्तींच्या सल्ल्याने मी आझम कॅम्पस येथे ऐच्छिक डिप्लोमासाठी प्रवेश घेतला. तिथल्या शिक्षकांनी कुराणाच्या अभ्यासाला मदत केली. तिथेच एका युवतीशी चांगली मैत्री झाली. तिच्या ओळखीतून मला जमाते-इस्लामी हिंदची माहिती मिळाली. येथे धार्मिक गोष्टी विनामूल्य शिकवतात व प्रशिक्षणासाठी महिलांची स्वतंत्र व्यवस्थाही असल्याचे समजले. या संस्थेच्या नजमाआपा शेख यांचे नाव कळले. त्यांनी त्यांच्या घरी बोलावून जवळजवळ वर्षभर मला इस्लामचे तत्त्वज्ञान, नमाज, अजाणीपर्यंत सर्व गोष्टी शिकवल्या. अर्थात या सगळ्या अनुभवांच्या शिदोरीवरच समर्थांनी मुसलमानी अष्टकांमध्येदेखील अद्वैतनिष्ठ शुद्ध अध्यात्म- शिक्षण एवढाच हेतू ठेवल्याचे मला आकळून आले आणि तसे स्पष्टपणे या ग्रंथात मांडता आले. समर्थ रामदासांनी केलेले अद्वितीय राष्ट्रीय आध्यात्मिक संघटन व हिंदू-मुस्लीम ऐक्याचे धडे सहज उलगडले.

समर्थांनी हिंदूंव्यतिरिक्त समाजगटाला अद्वैत तत्त्वज्ञानाचे धडे देणे हे काही भारताला नवे नव्हते. कारण त्याआधी १२ व्या शतकात अफगाणिस्तान सीमेवर जन्माला आलेल्या सूफी पंथानेही इस्लामचा भाग असूनही अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केलेला आहे. तसे भारतीय समाजाची संमिश्र संस्कृती लक्षात घेऊन समर्थांनी या मुसलमानी पदावल्यांची रचना केली. ईश्वराची उपासना हव्या त्या धर्मपद्धतीने करा, तरीही भारतातील मूळ अद्वैत तत्त्वज्ञान हे सर्वसमावेशकच आहे.

महाराष्ट्राबाहेरील १८ ठिकाणांसह ९२ स्थानी समर्थस्थापित रामदासी मठ-संपर्कस्थाने आजही अस्तित्वात आहेत. त्यामुळे रामदासांना मराठीव्यतिरिक्त इतर राज्यांतील संपर्कासाठी दखनी-उर्दूचा वापर हा अनिवार्य होता हे लक्षात येऊ लागले. कारण बाकी २०१ पदावल्या या फक्त अमराठी हिंदूंसाठी तसेच तत्कालीन समाजाची गरज दर्शवीत होत्या. रामदासांचा परिपूर्ण अभ्यास करण्याच्या माझ्या ध्यासात समर्थचरित्रामधील भारतभ्रमणाच्या इतर पैलूंचाही अभ्यास सुरू होताच.

(पान ८ पाहा)

समर्थ रामदासकृत
दखनी-उर्दू पदावल्या
300
मनीषा बाठे
प्रकाशक

रामदासांची सर्वसंचारी काव्यप्रतिभा

■ मुकुंद संगोराम

सांप्रत काळी संत आणि त्यांचे धर्म हेच वादाचे विषय ठरत असताना समर्थ रामदास यांच्यासारख्या प्रत्युत्पन्नमती संताने अवघ्या भारताला प्रदक्षिणा घालून अमराठी लोकांसाठी जे विचारधन लिहून ठेवले ते फार मोलाचे आहे. त्या काळातील दखनी उर्दू म्हणजे देवनागरी लिपीतून लिहिल्या जाणाऱ्या भाषेतून समर्थांनी सामान्यांच्या जगण्यातील विसंगतींचे दर्शन घडवत असतानाच कोणाचाही तिरस्कार कसा करू नये, याचे फार सुरेख विवेचन केले आहे. हल्ली रामदासांच्या ब्राह्मण्यावर होत असलेल्या सततच्या टीकेच्या पार्श्वभूमीवर प्रथमच प्रसिद्ध होत असलेल्या त्यांच्या दखनी उर्दूतील पदावल्यांचे महत्त्व अधिकच वाढते. संत नामदेवांनी तेराव्या शतकातच परप्रांती जाण्याचा निर्णय घेतला. ते थेट पंजाबला पोहोचले. मराठीतून अतिशय प्रासादिक रचना करणाऱ्या नामदेवांना तेथील भाषेचा गंध असणे शक्य नव्हते. अशा स्थितीत ती भाषा अवगत करून तिच्यावर प्रभुत्व मिळवणारे नामदेव हे पहिले मराठी संत. त्यांच्यानंतर सुमारे दोनशे वर्षांनंतर समर्थ रामदासांनी साताऱ्याहून निघून उत्तर व दक्षिण भारताचे पर्यटन केले. त्यांच्यासाठीही भाषेचा अडसर होताच. परंतु विचारांची बैठक पक्की असल्याने त्यांनी दखनी उर्दू भाषेत अमराठी लोकांसाठी रचना केल्या. हे सारे गुलदस्त्यात राहिलेले साहित्य मनीषा बाठे यांच्या अथक प्रयत्नांमुळे मराठीजनांसमोर आले आहे. यानंतर तरी समर्थांबद्दलच्या प्रवादांना विराम मिळेल अशी आशा करण्यास हरकत नाही.

संतांचे वागणे, बोलणे आणि लिहिणे हे सारेच काळाच्या परिघाला ओलांडून जाणारे असते. जे बोलतो किंवा लिहितो तसेच वागतो, असे जगण्यातील एकसंधत्व फार थोड्यांच्या ठायी दिसते. संतपणाचा कदाचित हाच अर्थ असेल. जगण्याचे अर्थ उलगडताना त्याकडे आरस्पानी नजरेने पाहण्याची ही सर्जनशील दृष्टी सामान्यांच्या आयुष्यात दिव्यत्वाची प्रचीती देणारी ठरते. संतांच्या प्रत्येक शब्दाला विचारांचा भरभक्कम आधार असतो आणि म्हणूनच ते शब्द काळाचा छेद करू शकतात. सतत प्रगत होत असणाऱ्या समाजालाही त्यातून पुनःपुन्हा काही नवे मिळत असल्याची जाणीव होते. आणि त्यामुळेच संतसाहित्याचे निरंतरत्व अधिक उठून दिसते. ज्ञानदेवांपासून सुरू झालेली ही परंपरा महाराष्ट्राच्या विचारधारेचा कणा बनते आणि त्यामुळे सांस्कृतिक प्रगतीपासून ते सामाजिक समस्यांपर्यंत जगण्याच्या हरएक पाकळीला स्पर्शून जाणारी ही भक्तीची परंपरा विचारांच्या प्रखर धगीतही अक्षरत्वाच्या आधाराने टिकून राहते. सामान्यांच्या जगण्यात दैनंदिन येणाऱ्या प्रश्नांना थेट उत्तरे मिळू शकणाऱ्या संतसाहित्यात समर्थ रामदास यांचे स्थान म्हणूनच वेगळेपणाने उठून दिसते. देशाटन करणाऱ्या संतांना माणसांची विविध रूपे जशी समजून आली, तशीच त्या माणसांच्या मनातील असंख्य प्रश्नांची वारुळेही उमजून आली. आळंदीसारख्या छोट्याशा खेड्यातून पैठणपर्यंत जाऊन आलेले संत ज्ञानेश्वर काय, किंवा आळंदीच्याच परिसरातून थेट पंजाबपर्यंत भ्रमण करणारे संत नामदेव काय, या सगळ्यांना ध्यास होता तो माणसाच्या जगण्यातील बौद्धिक उन्नयनाचा. रामदासांसारख्या संतांसाठी भ्रमंतीचा हा वारसा महत्त्वाचा होता. परकीय शक्तींचा बीमोड करण्यासाठी सामान्यांना उद्युक्त करण्याचा त्यांचा मनोदय या भारतभ्रमणातून पुनःपुन्हा स्पष्ट होताना दिसतो.

'जेणे निरसे हे अज्ञान, तया नाव ब्रह्मज्ञान' इतक्या सोप्या शब्दांत रामदास ज्ञानाचे महत्त्व विशद करतात. अल्पाक्षरत्वाबरोबरच त्यातून व्यक्त होणारा विचार त्यांच्या काव्यात अधिक सुस्पष्ट असतो. रामदासांना जेव्हा *'अज्ञानास भेटता अज्ञान, तेथे कैचे सापडेल ज्ञान'* असे म्हणायचे असते तेव्हा ज्ञानदेवांचा *'वाळवोनी काचरी करावी सांजवेलेची'* (सांजवेल चिरून तिच्या काचऱ्या करता येत नाहीत.) हा विचार त्यांना पक्का ठाऊक असतो. त्याचवेळी *'चिरोनी केळी केळ गाढव तो'* (केळीचे झाड चिरून केळ्यांचा घड मिळत नसतो.) हा संत तुकोबारायांचा सल्ला त्यांच्यासमोर उभा असतो. कवी म्हणून रामदासांचे वेगळेपण त्यांच्या भाषासौष्ठवात आणि त्यातील रोखठोकपणात अधिक दिसते. संत ज्ञानदेवांच्या भाषेतील मार्दव आणि शब्दांना आलेली गोलाई, संत तुकाराम महाराजांच्या साहित्यातील थेट भिडणारा भाव, नामदेव- एकनाथ यांच्या काव्यातील साधेपणा अशा साहित्यिक वलयात शब्दांचा अतिशय नितळ वापर करीत समर्थ रामदास सामान्यांना त्यांच्याच भाषेत भिडण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे *'अचपळ मन माझे, नावरे आवरीता'* हे समजणे काही शतकांनंतरही सहजसोपे होऊन जाते. शब्दांना छंदात कापून-छाटून बसवण्याची गरजच त्यांना कधी वाटत नाही. काय सांगायचे आहे,हे आकळले असेल तर कसे सांगायचे,याचा विचार करावा लागत नाही, हा साहित्याचा सिद्धान्त रामदासांच्या काव्याला लागू पडतो. नुसता सोपेपणा असला म्हणजे साहित्य श्रेष्ठ होत नाही, तर त्यात अनुभवाचे सार ओथंबावे लागते. रामदासांच्या अनेक ओव्यांमध्ये ते झिरपलेले पाहायला मिळते. मराठी भाषेतला रांगडेपणा जसा त्यांच्या काव्यात सहजस्फूर्तीने येतो, तसाच विचारांचा प्रखरपणाही तेजोमान होतो. मराठी भाषेतील 'ळ' या व्यंजनाचा सढळ उपयोग करणाऱ्या रामदासांना 'ड' हे व्यंजनही कमी महत्त्वाचे वाटत नाही. *'सत्राणे उड्डाणे ओंकारवदने'* ही रचना त्याची साक्ष आहे. त्याचप्रमाणे *'कर्मसीळ आचारसीळ, दानसीळ धर्मसीळ, सुचिस्मंत पुण्यसीळ, अंतरशुद्ध कृपाळू'* यासारख्या सहजसुलभ भाषेतून स्रवताना त्यांच्या असंख्य रचना सहजपणे मनात ठसतात. समर्थांच्या पद्यरचनांमध्ये छंदाचा हट्ट असला तरीही तो बोजड वाटत नाही. त्यामुळेच त्यांचे साहित्य केवळ सुविचाराचे राहत नाही. त्याला काव्याचा सुगंध प्राप्त होतो आणि त्या गंधात कठोर व्यंजनेही सहज विरघळून जातात. संत नामदेवांच्या नंतर महाराष्ट्राबाहेर भ्रमण करणारे रामदास हे पहिले संत. ही भ्रमंती त्यांच्या सामाजिक जाणिवा अधिक रुंदावणारी तर होतीच; पण त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या भाषक सर्जनशीलतेलाही ती आव्हानदायी होती. या सगळ्या प्रवासात त्यांच्यातील कवी सतत संशोधनात मग्न होता. त्यांच्या या पर्यटनकाळात तत्कालीन समाज समजावून सांगणाऱ्या दखनी उर्दू पदावल्या वाचताना हे लक्षात येते. त्या काळातील दखनी उर्दू भाषेत समाविष्ट असलेल्या अठरा बोलींपैकी तेरा बोलींमध्ये समर्थांनी पदावल्या लिहिल्या. परभाषा अवगत होणे आणि त्यातून सर्जनशील लेखन करणे, या दोन गोष्टी फार अंतरावरच्या असतात.

(पान ८ पाहा)